सांडणें	उरणें	औषधि	तापविणें	डेवरणें
इटाळें	अलपा	अजून	नामाथणें	तळसणें
सुहाडा	हरीप	हातोसा	पालटणें	तारठणें
होळाव	होऊन	लचांडी	बदलणें	तावडणें
वाकुडी	भेडुका	बाईल	पाठविणें	निरविणें
बहाळी	फिरंगी	वोमाय	वरिखणें	मुरडणें
ठाऊक	तकवा	तणावा	श्रमविणें	अटरणें
दंदिया	धनीण	ठाउका	उचकणें	उसपणें
घालून	गनीम	कागदी	उत्पादणें	आरोगणें
हिंवाळा	चंगळ	झोपाळा	विलसणें	वाढविणें
चोहटा	झुगारा	चावडी	फेंरकणें	भुकेजणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ६८ वा

मराठीमध्यें लिहा



पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ६९ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

गोपाल	टोपला	तडाग	चरखा	ढोसरा
तंडुल	खानगी	ताजगी	दसरा	जीमूत
धाकटा	थिराई	गणना	नगर	तनुज
चपला	द्यमक	तिलक	जवान	दूषण
कोपरा	परशु	वसंत	कलत्र	नैतिक
दगड	कदापि	विचित्र	गरीब	भाषण
जेवण	नादान	झोडगा	रानटी	कायम
लकडी	बाजार	लेखक	छाकटा	बकरी
मंजूर	गुणज्ञ	श्रावण	तोरडी	प्रसंग
तनखा	सुलभ	निकरा	हटेला	भूधर
विकल	छकडी	अगर	प्रभात	चरित्र
शहर	अलोट	उदार	गाभार	शरण
पाठक	कटाह	अडीच	भावना	समय
बजाज	मनुज	विज्ञान	कमीज	भडसा
विषाय	गुजारा	निबंध	पांढरा	मडकें
विनय	पावक	ललाट	चुकाऊ	रामठ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ७० वा

मराठीमध्यें लिहा



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ७१ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

इकडे	मिश्रण	परीक्षा	यमुना	वियोग
दुसरा	उचक	श्रीयुत	बोडण	अंगुली
रहाट	क्षत्रिय	गलफ	औरस	हपूस
काबीज	कोपरा	विक्रय	मासिक	आजार
बैठक	समिति	गवाक्ष	अढळ	रांधण
रक्कम	कपटी	रचित	दौलत	हयात
जमीन	अकाल	इजार	योजना	गोशाला
नेणता	पाटीर	खजिना	दायक	उन्नति
चामर	ओघळ	कामठ	क्षमण	सिसाळे
सुगम	तवाब	रश्मि	अफाट	चाकरी
धरती	नियोग	गुणज्ञ	नेहमीं	अनीति
आनंद	खातरी	एवढा	डंभाई	रसाळ
लोचन	प्रलय	जालिम	येकट	सुहाव
विदुर	सायक	उपखा	बोंदरा	लिगाड
चातक	सूचना	तमाखू	हितैषी	काषाय
जहाज	यौवन	भिक्षुक	पेशगी	घाटणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ७२ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

घटिका	लंघन	रेजगी	धवल	जबाब
लंपट	ठिकाण	अतिथि	मोटका	चातक
हिशेब	बाणसी	गठडी	रोचिस	पर्वत
नकाशा	तिमिर	उमज	शकट	धोरण
शेंपटा	वैदेही	जनता	हडस	ग्रामिणी
ताकद	जंगली	खूक	पंचमी	ताकीद
कराल	उशीर	प्रयास	शिकाऊ	देवाज्ञा
अमर	खगोल	पानक	कठोर	पडाव
बगीचा	अमोघ	दुनिया	अनुज	बहुल
टेहर	भुसार	रहित	बुभुक्षा	चिडिया
मौलवी	खामोश	मदार	दोहद	त्रिताप
डिकाळ	पोकळ	तक्षक	तत्रापि	भोजन
उजर	मजाल	पूजक	तिजोरी	फसल
रानटी	गोचर	दैनिक	पोषण	निगम
नायक	ताठर	पथारी	वकील	गोठण
मुनाफा	निदान	गणित	पंडित	महिमा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ७३ वा

मराठीमध्यें लिहा



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ७४ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

१. मुलांनीं लढाई, झगडा करूं नये.
२. शिशिर आणि हेमंत ऋतूंत थंडी जास्त पडते.
३. मुंबई बंदर अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर आहे.
४. हिंदुस्थानची लोकसंख्या जवळजवळ ३५ कोटी आहे.
५. यमुनेच्या किनाऱ्यावर आम्हीं मोठीं मोठीं कासवें पाहिलीं.
६. आमचें कापडाचें दुकान आग्ऱ्यास जौहरी बाजारांत आहे.
७. तलाव आणि शहराच्या मध्यें एक सुंदर बगीचा आहे.
८. आमच्या कमिटीचे सर्व सभासद त्या खोलींत विचार करीत आहेत.
९. प्राचीन काळीं युरोपांत रोमन राज्याचा फार मोठा प्रभाव होता.
१०. आमच्या शाळेंत लावलेलीं पुस्तकें ह्या शहरांत कोणत्या दुकानीं विकत मिळतात ?
११. त्याच्या डेस्काच्या ड्रॉवरमध्यें बारा पेन्सिली आणि सोळा टाक आहेत.
१२. रमेश आपल्या घराचें वर्षाचें भाडें किती देतो ?
१३. लेखकानें आमच्या पुस्तकाची भूमिका फार काळजीपूर्वक लिहिली आहे.
१४. बिहारमधील भूकंपानें भारतवासी गरीब जनतेस आणखी गरीब बनविलें.
१५. हिंदुस्थानांत बालविवाह थांबविण्यासाठीं एक कायदा बनविला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ७५ वा

मराठीमध्यें लिहा



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ७६ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

१. मधुर वाणीसाठीं पोपट पिंजऱ्यांत घातले जातात.
२. पुस्तकांचें अध्ययन आणि अध्यापन ह्यांनीं बुद्धीचा विकास होतो.
३. त्यांच्या दुकानांत प्रत्येक गोष्टीची फाइल वेगवेगळी असते.
४. लोंकरीचा हिशेब जुन्या वहीवरून पाठवून द्या.
५. स्वतःच्या हातानें बनविलेलें भोजन फार चांगलें असतें.
६. आपल्या आयुष्यांत त्यानें पुष्कळ ठिकाणीं भ्रमण केलें आहे.
७. खरें बोलणाऱ्याचा नेहमीं विजय होतो.
८. बाजारांतून कांहीं द्राक्षें, डाळिंबें, काकड्या व नारिंगें घेऊन या.
९. मोंगल साम्राज्याचे वेळीं युरोपिअन लोक पहिल्या प्रथम भारतवर्षांत आले.
१०. संकटाचे वेळीं प्रत्येक माणूस आपल्या इष्ट देवाचें स्मरण करतो.
११. शारदा कायद्याप्रमाणें चौदा वर्षांपेक्षां लहान मुलीचा विवाह होऊं शकत नाहीं.
१२. पाचक चूर्णाच्या एका बाटलीची किंमत बारा आणे आहे.
१३. ते समाजांत चांगल्या विचारांचा प्रचार करण्यासाठीं अधीर झाले आहेत.
१४. आपण पॉलिसी घेऊन किंवा एजंट बनून फायदा करून घेऊं शकतां.
१५. अधिकाऱ्यांचें लक्ष शासनांत सुधारणा करण्याकडे असलें पाहिजे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ७७ वा

मराठीमध्यें लिहा



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ७८ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

१. तुमच्या सदऱ्यास किती बटणें आहेत ?

२. भुंगे गुलाबाच्या फुलांचा सुगंध लुटीत आहेत.

३. प्रत्येक मनुष्यानें नेहमीं चांगली भावना ठेवली पाहिजे.

४. खरें सांगण्याची काळजी घेणें प्रत्येक पुरुषाचें कर्तव्य आहे.

५. शीतळ मंद सुगन्धित वारा वाहत होता.

६. रोज सकाळीं फिरणें अत्यंत लाभदायक आहे.

७. बिहारमध्यें तांदुळाचीं शेंकडों यंत्रें लागलीं आहेत.

८. आपली रॅकेट घेऊन ते टेनिस खेळण्यास जात होते.

९. मोहन आपल्या जीवनाचें ध्येय आखूं शकतो.

१०. प्रवासामध्यें कुकरच्या मदतीनें भोजन बनविणें सोपें असतें.

११. लढाईच्या आधीं अंगद रावणासमोर गेला.

१२. आळशी पुरुष आपल्या जीवनांत यशस्वी होऊं शकत नाहीं.

१३. सीताहरण रावणाच्या मृत्यूस कारण झालें.

१४. मेघांची गर्जना, विजेची चमक आणि अंधाऱ्या प्रळयाचें दृश्य दिसत होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ७९ वा

मराठीमध्यें लिहा



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ८० वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

गडखल	चटपट	मालमात	दंडनीय	जादूगार
तजवीज	सोमवार	चतुराई	हिमालय	चुटकुला
अवधान	धडपड	गड्दर	रामायण	तइनात
गणनीय	रुचिकर	वकीलात	विपुलता	पादचारी
उपराण	समुदाय	तपोवन	सभापति	गदाधर
चित्रकार	गबदुल	अखबार	वाढवण	देवलोक
टीकाकार	सुधारक	जनावर	समजूत	मानपत्र
एकंदर	तसलीम	विलायत	रोजगार	गुरुवार
मळकट	गुरुकुल	विवक्षित	आळवण	मोक्षपद
परिणय	एकवटा	शेतकरी	तडजोड	गृहस्थ
कमजोर	धनवान्	पाठवणी	एकीकडे	जरायुज
नियमित	मेळवण	मायथळ	कमनीय	मधुकर
कोतवाल	रविवार	घडामोड	बनकर	पंचायत
रजपूत	महाराज	दशानन	दरबार	मेहनती
बहुमत	गुलजार	पटवारी	नागरिक	कलुषित
करतल.	मानसिक	देवदूत	कमिशन	भयभीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ८१ वा

मराठीमध्यें लिहा



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ८२ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

गडबड	निराधार	तसबीर	मुलायम	साहूकार
यजमान	परिचय	अधिक्षेप	निरूपण	स्थानपति
हाटवट	तालवर	भानगड	अभिनय	दानशील
दुश्मन	षडानन	गहजब	पराजय	भुलवणी
रोजनामा	सौमवार	सिंहासन	युवराज	मनोरथ
तकशीर	ताडातोड	तुकतुकी	दयामय	थबकड
आलमाल	दणकट	साहसिक	गुजरा	सरदार
महिमान	अचपल	पक्षपात	हितकर	रचयिता
अणगट	गुलबास	लोकमत	वंदनीय	ठेवणाऊ
राजधानी	अलंकार	महाशय	चौकीदार	लखपति
छबीदार	लागवग	संनिधान	पलीकडे	शेतवाडी
राजकुल	लवकर	ठोसराई	अपमान	माननीय
पायघोळ	संपादक	वशीयत	फौजदारी	वनेचर
शीलवान्	तकदीर	पुनरपि	सहकार	तदबीर
फसकल	नानावटी	तहरीर	हलवाई	लहानगी
संशोधन	तोहमत	राजकीय	माराकुटी	रक्षणीय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ८३ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

गर्जना	काश्मीर	राष्ट्रीय	सेक्रेटरी	चक्रवर्ती
कार्तिक	स्वदेश	गृहस्थ	लष्कर	तात्पर्य
चिकीर्षा	तात्त्विक	वऱ्हाड	कृषीवल	वर्तमान
निर्भय	नास्तिक	सांप्रदाय	विकल्प	विद्यालय
द्वितीय	स्मरण	जघन्य	तत्काल	तत्त्वार्थ
प्राचीन	परिग्रह	विद्वान्	दुराग्रह	विसर्जन
वार्षिक	निश्चय	डॉक्टर	स्वरूप	गर्हणीय
कीर्तन	ब्राह्मण	इन्द्रिय	कारागृह	विशेषत:
गांभीर्य	यद्यपि	स्वाधीन	प्रामाणिक	दुष्कर
कुतर्क	स्वीकार	तत्पर	विख्यात	विद्यार्थी
चूर्णिका	प्रकाशित	स्पष्ट	सत्कार	निष्काम
तर्पण	मस्करी	म्हणजे	तस्करी	मनस्वी
निर्मूल	आस्पद	दप्तर	प्रस्ताव	निष्फल
निर्वाण	माध्यम	शुक्रवार	दृष्टांत	प्रतिपदा
निर्भर	व्यायाम	रहस्य	अन्यथा	प्रवचन
निर्वाह	ईश्वर	म्हणणें	प्रस्तुत	प्रयोजक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ८४ वा

मराठीमध्यें लिहा



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ८५ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

१. चाणक्य राजनीतीचा धुरंधर विद्वान् होता.

२. अकबर, शहाजहां आणि जहांगीर मुगल बादशाह होते.

३. पाठशाळेच्या स्थापनप्रसंगीं एक मोठा उत्सव केला गेला.

४. बिकानेरचे महाराज फेब्रुवारीमध्यें विलायतेस जाण्यास निघतील.

५. ह्या इमारतीच्या तळघरांत पुष्कळशा चांगल्या मजबूत तिजोऱ्या आहेत.

६. सभापतींनीं अत्यंत आनंदानें अध्यक्षांचें स्वागत केलें.

७. अमेरिकेंतील जुन्या रहिवाशांचा इतिहास मिळत नाहीं.

८. येथील चेंबरच्या अध्यक्षांना सरकार-ठराव पसंत आहे.

९. त्या मशिदीचा दरवाजा सागवानी लाकडाचा बनविला आहे.

१०. ह्या बातम्यांनीं त्या वर्तमानपत्रांतील समाजांत खळबळ उडविली.

११. वॉटरलूच्या लढाईंत फ्रेंच सैनेचा पराभव झाला.

१२. अध्यक्षांनीं संघटन व मदतीची सभासदांजवळ प्रार्थना केली.

१३. त्या खटल्यांत अपराध्यावर जातमुचलके करण्यांत आले.

१४. प्रत्येक मनुष्यानें थोडासा तरी शारीरिक व्यायाम केला पाहिजे.

१५. युरोपीय महायुद्धाच्या इतिहासांत भारतीय शिपायांचें नांव सोनेरी अक्षरांनीं लिहिलें जाईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ८६ वा

मराठीमध्यें लिहा



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ८७ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

एका बादशाहानें दरबारासाठीं एक मोठा महाल बनविला. त्याच्यासाठीं एका मोठ्या तुळईची जरूरी होती व ती जवळच्या शहरांत मिळेना.

प्रत्येक कामगाराच्या नांवानें हुकूम सुटले आणि खूपशी चौकशी झाल्यानंतर एका ठिकाणाहून तशी तुळई आली. बादशाहाला महालाची फार काळजी होती. सकाळीं सर्व दरबाऱ्यांसमवेत बादशाह काम पाहण्यास स्वत: आला.

शेंकडों मनुष्यें जमा झालीं होतीं. एक बावळा फकीर तुळईजवळ आला व कांहीं बोलून दूर झाला. बादशाहानें विचारलें, "तूं तुळईला काय विचारलेंस ? आणि तिनें काय उत्तर दिलें ?"

फकीर म्हणाला, " मीं विचारलें कीं, 'हे तुळई, तुझ्यांत अशी काय गोष्ट आहे कीं इतक्या कसोशीनें तुला दुरून आणविलें आणि बादशहा सर्व दरबाऱ्यांसह तुला पाहण्यास आला ?' तिनें उत्तर दिलें, 'सरळपणा.' "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ८८ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

एक माळी व कुंभार ह्यांनीं मिळून एक उंट खरेदी केला व ते परदेशीं जाण्यास निघाले. कुंभारानें उंटाच्या पाठीवर एका बाजूस मडकीं लादलीं आणि माळ्यानें दुसऱ्या बाजूस भाजी.

रस्त्यांत मान मुरडून उंटानें भाजी खाण्यास सुरुवात केली आणि लौकरच सगळी खाऊन टाकली. हें पाहून कुंभार हंसत होता आणि समजत होता कीं, माझ्या मडक्यांना कांहींच नुकसान पोहोंचणार नाहीं.

परंतु जेव्हां उंटानें एका बाजूची सर्व भाजी खाल्ली तेव्हां तिकडचा बोजा हलका झाल्यानें इकडच्या बाजूचीं मडकीं खालीं घसरलीं आणि जमिनीवर आदळून त्यांचे तुकडे तुकडे झाले.

तेव्हां माळ्यानें कुंभारास म्हटलें कीं, 'कोणाचेंहि नुकसान झालें असतां हंसणें चांगलें नाहीं.'

पाठ ८९ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

एक बादशाह फार इमानी होता. तो सत्यवादी आणि इमानी माणसांची कदर करीत असे. एके दिवशीं तो तुरुंगांतील कैद्यांना पाहण्यास गेला असतां एका कोठडींत दोन कैदी कोंडलेले त्यानें पाहिले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बादशाहानें दोन्ही कैद्यांना बोलावून विचारलें कीं, "तुम्हीं असा कोणता अपराध केला कीं, त्यामुळें तुम्हांस बंदिवान व्हावें लागलें !"

एका कैद्यानें सांगितलें कीं, "माझ्यांत आणि न्यायाधीशांत शत्रुत्व असल्यानें त्यानें मला माझा कांहींच अपराध नसतांना शिक्षा दिली." दुसऱ्यानें सांगितलें कीं, "मीं १०० रुपयांची चोरी केली म्हणून मला शिक्षा झाली. न्यायाधीशाचा कांहींच दोष नाहीं. मीं जसें केलें तसें भोगतों आहें."

ह्यां कैद्याच्या खरें बोलण्यावर बादशाह अत्यंत खूष झाला, आणि म्हणाला कीं, "ह्या इमानी लोकांबरोबर तूं राहणें चांगलें नाहीं" व दुसऱ्यास म्हणाला कीं, "तूं खोटें बोलतो आहेस तेव्हां तुझा अपराध माफ होऊं शकत नाहीं."

पाठ ९० वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

एकदां दोन मनुष्य जंगलांतून चालले होते. दोघांमध्यें असें ठरलें कीं, जर रस्त्यांत कांहीं संकट आलें तर एकानें दुसऱ्यास मदत करावी.

एक दिवस चालतां चालतां झाडीमधून एक अस्वल बाहेर निघाला. त्याला पाहतांच त्यांच्यापैकीं एक पळाला आणि आपल्या सोबत्यास एकटा सोडून एका झाडावर चढला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसरा मनुष्य जेव्हां एकटा राहिला तेव्हां तो जमिनीवर निजला आणि प्रेताप्रमाणें पडला. अस्वल त्याच्याजवळ आला आणि नाकानें त्याच्या तोंडाचा आणि कानाचा वास घेऊं लागला. जेव्हां त्यानें पाहिलें कीं हा माणूस श्वास घेत नाहीं व हातपाय हालवीत नाहीं, तेव्हां तो मेला आहे असें समजून त्यास सोडून तो चालता झाला. अस्वल दूर निघून गेल्यानंतर मेल्याप्रमाणें पडलेला माणूस उठून उभा राहिला आणि त्याचा सोबतीहि झाडावरून खालीं उतरला.

जो माणूस झाडावर चढला होता त्यानें आपल्या सोबत्यास विचारलें कीं, "अस्वल वारंवार आपलें तोंड तुझ्या कानांजवळ नेत होता—जसें कांहीं तुझ्या कानांत तो कांहींतरी सांगत होता !" हें ऐकून त्याच्या सोबत्यानें उत्तर दिलें कीं, "होय. त्यानें मला अशी गोष्ट सांगितली कीं, जी मी कधींच विसरणार नाहीं. ती ही होती कीं, 'स्वार्थी माणसांच्या बोलण्यावर कधींच विश्वास ठेवूं नये.' "

पाठ ९१ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

असें म्हणतात कीं, लुकमानच्या मालकानें एका वर्षी एका शेतांत जव पेरण्याची आज्ञा दिली. लुकमाननें जव पेरण्याऐवजीं हरभरे पेरले.

जेव्हां लुकमानचा मालक शेत पाहण्यास गेला तेव्हां हिरवेगार चणे पाहून त्यानें लुकमानला म्हटलें, " मीं तुला ह्या शेतांत जव पेरायला सांगितलें असतां तू हरभरे कां पेरलेस ? "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लुकमाननें म्हटलें, " मीं चणे ह्या भरंवशावर पेरले कीं त्यांचे जव पैदा होतील."

मालक म्हणाला, " तूं किती मूर्ख आहेस ? जगांत असें कधीं झालें आहे काय कीं, चणे पेरले असतां जव निघतील ?"

लुकमाननें म्हटलें, " आपण नेहमीं जगाच्या शेतांत पापाचें बीं पेरतों आणि इच्छा करतों कीं ह्याचें फळ चांगलें मिळावें. तेव्हां मींहि विचार केला कीं, जर चणे पेरले तर जव निघतील." हें ऐकून मालक शरमिंदा झाला.

पाठ ९२ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

तीन मनुष्यांनीं एकाच तऱ्हेचा गुन्हा केला असूनहि ज्या राजाच्या राज्यांत ते राहत होते त्यानें त्यांना तीन तऱ्हेची शिक्षा दिली. एकाला नुसती समज देऊन सोडून दिलें, दुसऱ्याला पुष्कळ बरेंवाईट बोलून सोडलें आणि तिसऱ्याची गाढवावरून धिंड काढण्याचा हुकूम दिला.

प्रधानानें राजास विचारलें कीं, " तिघांनीं एकच गुन्हा केला असतां तिघांना तीन तऱ्हेची शिक्षा आपण कां दिली ?"

राजा म्हणाला, " ह्या गोष्टीचें कारण तुला आतांच समजेल. हे तिघे काय करीत आहेत त्याची खबर आणीव."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रधानानें चौकशी केली असतां समजलें कीं, ज्याला समज देऊन सोडलें होतें त्यानें विष पिऊन आमहत्या केली; ज्याला बरें-वाईट बोलून सोडलें होतें तो घरदार सोडून दुसऱ्या शहरीं चालता झाला, आणि ज्याची गाढवावरून धिंड काढली होती तो दारू पिऊन जुगार खेळत होता.

तेव्हां राजानें म्हटलें कीं, "चांगल्या व हलक्या माणसाच्या शिक्षेंत फरक असला पाहिजे. चांगल्या माणसाला शब्दाचा मार पुष्कळ आहे आणि हलक्या माणसास गाढवावरून धिंड काढली तरीहि शरम वाटत नाहीं."

पाठ १३ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

एके दिवस पंजाब-केसरी महाराजा रणजितसिंह फिरावयास गेले. मैदानांत पोंचतांच सर्व घोडेस्वार एका बाजूला उभे राहिले आणि महाराज घोड्यावरून उतरून फिरूं लागले. एक दरिद्री मोगल नंगी तलवार घेऊन तेथें आला, परंतु त्याला कोणीं पाहिलें नाहीं. परंतु महाराजांच्यावर जेव्हां त्यानें तलवारीचा हात उगारला तेव्हां खुद्द महाराजांनीं त्याचा हात पकडला. इतक्यांत ह्या साहसी मोगलावर शेंकडों घोडेस्वार तुटून पडले. परंतु महाराजा रणजितसिंह म्हणाले, "हां खबरदार! ह्याला कोणीहि मारूं नका." महाराजां-पुढें उभा केला असतां महाराजांनीं त्याला विचारलें, "तूं कां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आलास आणि तुझी काय इच्छा आहे?" त्यानें आपल्या दारिद्र्याचा सर्व पाढा वाचला. महाराज त्याची बहादुरी व सत्यप्रियता पाहून फार खूष झाले आणि त्याला मुलीच्या लग्नासाठीं ५०० रुपये दिले आणि त्याला चांगल्या हुद्यावर नोकरीस ठेविलें.

पाठ १४ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

एके दिवशीं गौतमबुद्ध आपला चुलत भाऊ देवदत्त ह्याच्यासहवर्तमान बसले होते. त्या वेळीं हंसांचा एक मोठा समूह मधुर कलकल करीत हिमालयाच्या बाजूस जात होता. देवदत्तानें सर्वांत पुढच्या हंसावर तीर मारला. तो हंस घायाळ होऊन जमिनीवर पडला. त्याचें दुःख पाहून बुद्धदेवांचे डोळे पाण्यानें भरून आले. त्यांनीं त्या मरणप्राय स्थितींतील हंसास उचललें आणि हलकेच तीर ओढून बाहेर काढला व त्याच्या जखमेवर औषध लावून त्याला आपल्या छातीजवळ धरलें. देवदत्त म्हणाला, "मीं त्या हंसाला खालीं पाडलें आहे. तो मला दे." बुद्ध म्हणाले, "तूं अत्यंत वाईट काम केलेंस! उगाच ह्या बिचाऱ्या गरीबास मारलेंस. तुला जराशीहि दया आली नाहीं. मी तुला हा हंस कधींच देणार नाहीं." दोघांमध्यें फार मोठें भांडण जुंपलें व तें तोडण्यासाठीं साधूंची एक सभा बोलाविली गेली. त्यांपैकीं एकानें म्हटलें, "मारणाऱ्यापेक्षां वांचविणाऱ्याचा हंसावर जास्त अधिकार आहे." ही गोष्ट सर्वांस पटली आणि तो हंस बुद्धदेवांच्या जवळच राहिला. चांगला झाल्यावर गौतमांनीं त्यास उडून जाऊं दिलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ९५ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

इराण देशाचा एक राजा फार न्यायी म्हणून प्रसिद्ध होता. एके वेळीं तो शिकारीसाठीं वनांत फार दूर गेला असतां तेथें आपल्या स्वयंपाक्यास स्वयंपाक जलद बनविण्याची त्यानें आज्ञा दिली. परंतु नोकर राजधानीहून मीठ आणण्याचें विसरला, म्हणून प्रधानानें एका मनुष्यास जवळचें गांव दाखवून जलदी मीठ आणण्यास सांगितलें. जो माणूस मीठ आणण्यास जात होता त्याला राजानें जवळ बोलावून सांगितलें कीं, "पैसे दिल्याशिवाय मीठ मागून आणलेंस तर मी नाराज होईन." प्रधानानें म्हटलें कीं, "महाराजांसाठीं थोडेंसें मीठ मागितलें तर त्याचे पैसे कसले द्यावयाचे ? ह्यांत कसला दोष ?" राजानें त्या माणसास जवळ बोलावून सांगितलें, "मी राजा आहें. मीं जर पैसे दिल्याशिवाय मीठ घेतलें तर ह्याच उदाहरणावरून राजाचे नोकरलोक विनामूल्य बहुमोल वस्तु घेण्यास सुरुवात करतील." हें ऐकून प्रधान शरमिंदा झाला आणि पैसे देऊन मीठ आणण्यास त्यानें माणूस पाठविला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ९६ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

नासिरुद्दीन जेव्हां कुणाला दुःखांत पाहत असे तेव्हां त्याचें हृदय भरून \ येत असे. हिंदुस्थानचा बादशाह असूनहि चंद्रमौळी झोपड्यांतून राहणाऱ्या गरिबांची तो अत्यंत \ चिंता करीत असे. ह्यासाठीं सर्व प्रजा त्याच्यावर मनापासून प्रेम करीत \ असून त्याच्या-साठीं प्राण समर्पण करण्यास नेहमीं तयार असे. तो \ आपल्या राजकर्तव्यांची फार काळजी घेत असे. त्याला चांगलेंच \ माहीत होतें कीं, \ हें अत्यंत कठीण काम आहे. त्याची एकच \ राणी होती व \ ती बिचारी घरचें सारें काम करीत असे \ स्वयंपाकहि स्वतःच बनवीत \ असे. एके दिवशीं स्वयंपाक करतांना तिचा हात भाजला. तिनें भीतियुक्त \ अंतःकरणानें हलक्या आवाजांत नासि-रुद्दीनला म्हटलें, " स्वयंपाक करण्यास एक दासी \ असती तर बरें झालें असतें." नासिरुद्दीन म्हणाला, " बेगम, तूं जाणतेसच \ कीं, पुस्तकें लिहून तीं विकून त्यांवर मी पोट भरतों. त्याचें \ उत्पन्न इतकेंहि नाहीं कीं आपण चांगल्या तऱ्हेनें पोट भरूं शकूं. मग \ दासी कसा ठेवूं शकेन ?" राज्याच्या खजिन्यांत माझा एक पैसाहि नाहीं.\ही सर्व जिंदगी प्रजेची आहे. आज त्यांतून मीं एक पैसा \ घेतला तर उद्यां परमेश्वरास काय जाब देऊं ? जसें होईल तसे \ हे कष्ट सहन कर. ईश्वर तुला ह्याचें फळ देईल."

सूचनाः—पुढील सर्व पाठांतून दहा दहा शब्दांपुढें चिन्ह केलें आहे. हें गति वाढविण्यासाठीं केलें आहे. म्हणजे मोजण्याची जरूर पडणार नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १७ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

रघुपतिसिंह रजपुतांचा एक मोठा सरदार होता. तो अकबराशीं नेहमीं लढत \ असे. म्हणून त्याला कैद करण्यासाठीं अकबरानें एकदां एक मोठी सेना \ पाठविली. हें ऐकून रघुपतिसिंह घर सोडून पळाला व एका अरण्यांत \ लपला.

तो ज्या वेळीं पळाला त्या वेळीं घरीं त्याचा मुलगा फार \ आजारी होता आणि अशी भीति होती कीं, तो पंधरा-वीस \ दिवसांचा सोबती आहे. परंतु अब्रू व प्राण रक्षण करण्यासाठीं मुलाला \ सोडून तो जंगलांत निघून गेला. त्यानंतर अकबराच्या फौजेनें त्याचें घर \ घेरलें आणि तो घरीं येतांच त्यास पकडावयाचें अशा तयारींत सर्व \ सैनिक \ होते.

रघुपतिसिंह जंगलांत भटकत असतां त्याच्या एका मित्रानें येऊन \ खबर दिली कीं, 'तुझा मुलगा मरणोन्मुख असून एकदोन दिवसांत मरेल.'\

हें ऐकून त्याचें हृदय फाटलें आणि प्राणाची पर्वा न करितां \ मुलाला पाहण्यासाठीं तो जंगलांतून घरीं गेला. परंतु दरवाजांत पाऊल टाकतांच \ अकबराच्या शिपायांनीं त्याला पकडलें. त्यानें शिपायांस सांगितलें, "मी आतां तुमचा \ कैदी झालों आहें. परंतु मी तुम्हांपासून एवढी सवड मागतों कीं, \ आंत जाऊन माझ्या मरणोन्मुख मुलाला पाहून येतों. जेव्हां मी आंतून \ परत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येईन त्या वेळीं मला पुन्हां कैद करा. मी रजपूत \ आहें. माझ्या वचनाप्रमाणें करण्यांत कधींहि अंतर पडणार नाहीं. तुम्हांस फसवून \ मी कोठेंहि पळून जाणार नाहीं."

हें ऐकून सैनिकांनीं रघुपतिसिंहास आंत \ जाण्याची परवानगी दिली. आंत जाऊन आपल्या मुलाला कवटाळून तो पुष्कळ रडला, परंतु थोड्या वेळानंतर पुन्हां बाहेर जाऊं लागला. मुलगा म्हणाला, "मी दोनचार घटकांचा सोबती आहें. मला सोडून कुठें जातां ?"

रघुपतिसिंहानें \ मुलाला आपला सर्व वृत्तांत सांगितला आणि म्हटलें, "शिपायांशीं वायदा करून \ आलों आहें. तो मी टाळूं शकत नाहीं." मुलगाहि रजपुताचाच बच्चा. त्यानें \ म्हटलें, "तुम्हांस असेंच केलें पाहिजे."

मुलाची भेट घेऊन रघुपतिसिंह सैनिकांच्या समोर येऊन उभा राहिला आणि म्हणाला कीं, "मला कैद करा." \ शिपायांच्या सरदाराच्या हृदयावर रघुपतिसिंहाच्या वीरश्रीचा आणि वचनप्रियतेचा इतका परिणाम \ झाला कीं, तो शिपायांस म्हणाला, "अशा सत्यप्रिय आणि वीर \ माणसाला कैद करण्यास माझें मन घेत नाहीं." इतक्यांत बादशाह स्वतः \ आला आणि सर्व हकीकत ऐकून रघुपतिसिंहास सोडून देऊन त्याच्या घरावरून \ पहारा उठविण्याची त्यानें आज्ञा दिली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ९८ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

पृथ्वीच्या पाठीवर पुष्कळ ठिकाणीं आणि हिंदुस्थानांत कोठें कोठें—विशेषेंकरून ग्वाल्हेर\राज्यांत—एक तऱ्हेचा काळा दगड मिळतो. त्याच्यांत अशी शक्ति आहे\कीं, तो लोखंडाला आकर्षित करतो. ज्या लोखंडावर त्याचें आकर्षण होतें\तें त्याला चिकटतें. त्याला सोडविण्याचा प्रयत्न केला असतां असें दिसून येतें \ कीं त्याला दगड आपणाकडे खेचतो. अशा दगडाला लोहचुंबक म्हणतात.

पुष्कळ मुलें\एक सुई ताम्हनांत ठेवून एक छोटा लोहचुंबक बोटांत लपवून ताम्हनाच्या\खालीं इकडे तिकडे फिरवितात. सुईसुद्धां इकडे तिकडे फिरूं लागते. वस्तुतः ती लोहचुंबकाच्या-मुळेंच\फिरते. असें म्हणतात कीं, पांच हजार वर्षांपूर्वी चिनी लोक लोहचुंबकाचा\उपयोग करीत असत. दिशा पाहण्यास ते ह्याचा उपयोग करीत असत. \ आजकालहि पाण्यांत जहाजांतून दिशा ह्याच्याच साहाय्यानें पाहतात. चुंबक लोखंडास आपल्याकडे \ खेचतो; परंतु दोघांत जो जास्त बलवान् असेल तो दुसऱ्यास आपणाकडे \ खेचतो.

लोक केव्हांपासून लोहचुंबक उपयोगांत आणूं लागले ह्याचा शोध निश्चितपणें\विद्वानांनाहि अद्यापि लागला नाहीं. परंतु असें सांगतात कीं, प्राचीन काळीं\गुजराथेंत एक मंदिर होतें. त्यांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रतिमा अधांतरीं लटकत होती. ज्या\ वेळीं मंदिरावर परचक्र अलें आणि त्याला तोडण्यासाठीं एक कोपरा तोडण्यांत \ आला तेव्हां मूर्तीसुद्धां खालीं पडली. असें दिसतें कीं, ही प्रतिमा \ चुंबकामुळें अधांतरीं लटकत होती. ह्याशिवाय प्राचीन संस्कृत पुस्तकांतूनहि ह्याचा उल्लेख \ सांपडतो. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, त्या वेळीं भारतवासी चुंबकाचा \ प्रयोग चांगल्या प्रकारें जाणत असत आणि त्यांचें चुंबकासंबंधीं ज्ञान फार \ उच्च दर्जाचें होतें. त्या वेळेपासून आजतागायत त्याची उन्नति झाली असती \ तर आज भारत फारच उन्नत दशेंत असता.

पाठ ९९ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

जयपूरचे महाराजा रामसिंग मोठे दयाळू आणि सज्जन होते. एक दिवस \ ते जंगलांत शिकारीसाठीं गेले असतां संध्याकाळ झाली आणि राजमहालाचा रस्ता \ चुकले. महाराज ह्या विचारांत पडले कीं, आतां काय करावें आणि रात्र कुठें काढावी ? इतक्यांत एका गरीब गवताच्या खोपटांतून दिवा जळत \ असलेला त्यांस दिसला. घोड्यास टांच मारून त्या झोपडीजवळ येऊन ते \ पोंचले आणि झोपडींत शिरले.

झोपडींत एक ७० वर्षें वयाची म्हातारी राहत \ होती. महाराज तिला म्हणाले, “ मी एक शिपाई आहें. माझा रस्ता \ चुकला आहे. जर तूं परवानगी देशील तर रात्रभर झोपडींत \ पडेन व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सकाळीं घरीं जाईन." म्हातारीनें म्हटलें, "माझ्याजवळ असलेलें \ गरिबाचें अन्न खा आणि येथेंच पडून रहा."

रात्रभर महाराज म्हातारीच्या \ झोपडींत झोंपले. सकाळीं राजवाड्यांत परततांना म्हातारीला त्यांनीं विचारलें, "ह्या जंगलांत \ तुझा निर्वाह कसा होतो? तुला मूलबाळ आहे कीं नाहीं?" म्हातारी म्हणाली, "ह्या जंगलांत गरीब वाटसरूंना पाणी पाजून मी निर्वाह करतें. माझा एकुलता एक मुलगा महाराजा रामसिंगांच्या फौजेंत नोकर आहे. परंतु बारा वर्षे झालीं, तो माझ्या दृष्टीस पडला नाहीं. जिवंत आहे कीं मेला कुणास माहीत!" असें बोलून मुलाच्या आठवणीनें ती म्हातारी रडूं \ लागली.

म्हातारीची ही स्थिति पाहून महाराजांचें अंत:करण भरून आलें. \ महाराज जातांना सांगून गेले कीं, "तुझी व तुझ्या मुलाची मी \ भेट करवीन." म्हातारीला त्यांच्या सांगण्याचा विश्वास वाटला नाहीं आणि बराच \ वेळ ती रडत होती.

महाराज जेव्हां राजवाड्यांत पोंचले तेव्हां त्यांनीं \ म्हातारीला बोलावणें धाडलें. जेव्हां म्हातारीला महाराजांसमोर शिपाई घेऊन आले तेव्हां \ ती कांपूं लागली. परंतु महाराजांचा चेहरा पाहून तिला आश्चर्य वाटलें. \ कारण जो शिपाई तिच्या झोपडींत निजला होता तोच महाराज रामसिंग \ निघाला.

महाराजांनीं हंसत म्हातारीकडे पाहून म्हटलें, "तूं जो माझा उत्तम माहुणचार केला \ त्याचें बक्षिस मी तुला देतों. तुझा मुलगा तुझ्यासमोर आहे. त्याला आपल्या बरोबर घेऊन जा. त्याला मी घरबसल्या पगार देईन."

हें ऐकून म्हातारी \ अत्यंत हर्षित झाली आणि आपल्या मुलाला बरोबर घेऊन \ आनंदानें घरीं परत गेली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १०० वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

पांचशें वर्षांमागें इंग्लंडच्या राजानें स्कॉटलंड जिंकण्यासाठीं त्याच्यावर चढाई केली. त्या \ वेळीं रॉबर्ट ब्रूस नांवाचा एक मनुष्य स्कॉच लोकांचा पुढारी होता. \ इंग्लंडच्या राजाचें सैन्य फार बलाढ्य होतें म्हणून आपला देश \ शत्रूच्या हातून सोडविण्यापूर्वीं कित्येक वेळां तो पराजित झाला. त्याला कधीं पोट \ भरून अन्न मिळत नसे, तर कधीं अर्धपोटींच राहावें लागे. परंतु \ आपलें ध्येय तो कधींच विसरला नाहीं. एका वेळीं कित्येक महिने-पर्यंत \ त्यास आयर्लंडच्या उत्तर किनाऱ्यालगतच्या एका बेटावर लपून राहावें लागलें. \

नेहमीं असें पाहण्यांत येतें कीं, चांगल्या कामांत विघ्नें येतात. \ रॉबर्ट ब्रूसवरहि पुष्कळ विपत्ति आल्या. सारख्या विपत्ति आल्या असतां मोठे \ मोठे साहसी पुरुषसुद्धां घाबरून जातात व मागें पाऊल घेतलें कीं पहिले सारे परिश्रम व्यर्थ जातात. जो मनुष्य विपत्ति आल्या असतां \ त्यांना लाथ मारून पुढें पाऊल टाकतो त्याला आपत्तीसुद्धां भिऊन सोडून \ जातात. असे साहसी पुरुष आपलें कार्य समाप्त करूनच विश्रांति घेतात. \

जेव्हां संकटें ब्रूसच्या भोंवतीं घारीप्रमाणें घिरट्या घालूं लागलीं तेव्हां तोहि \ आपल्या ध्येयापासून परावृत्त होऊं लागला. शत्रू-पासून बचाव करण्यासाठीं तो एका \ झोपडींत लपला. त्या वेळीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देशाच्या स्वातंत्र्ययुद्धांतून हात काढून घेण्याचाहि विचार \ त्याच्या मनांत आला. एक दिवस बिछान्यावर पडल्या पडल्या तो विचार \ करीत असतांना त्यानें एक कोळी पाहिला. तो कोळी आपलें जाळें \ रचण्यासाठीं एका गोळ्यापासून दुसऱ्यावर उडी मारीत होता. एक वेळ उडी \ मारली, पण तो खालीं पडला. दुसऱ्या वेळीं उडी मारली, पण त्या वेळींहि तो यशस्वी झाला नाहीं. तिसऱ्या खेपेसहि तो खालीं पडला. \ परंतु धन्य त्या कोळयाची! त्याला वारंवार पडण्याचें कांहींच वाटलें नाहीं. \ त्याचें लक्ष जाळें रचण्यांत गुंतलें होतें. चौथ्या वेळेसहि बिचारा खालीं \ पडला. पुन्हां वर चढला, परंतु पुन्हां खालीं पडला. परंतु काय \ आश्चर्य! त्याला इतक्यावरहि आपल्या प्राणांची पर्वा वाटली नाहीं. "अज्ञान कोळी आपल्या प्राणाशीं खेळत आहे. पांच वेळां पडल्यानें त्याच्या कंठीं प्राण आले \ असूनहि सहाव्यांदा तो चढाई करीत आहे. पहा, त्यानें उडी घेतली. \ अरेरे, बिचारा पुन्हां पडला. हे अभागी कोळ्या, तुझी स्थितिहि माझ्याप्रमाणेंच \ झाली. इंग्रजांशीं लढण्यांत सहा वेळां माझा पराजय झाला. परंतु हें \ काय! पुन्हां सातव्यांदा उडी मारण्याची त्याची तयारी. मी जगांतील सर्वोत्कृष्ट \ प्राणी सहा वेळां अयशस्वी झालों असतां हार मानली, पण हा \ तुच्छ प्राणी हरला नाहीं. ही गोष्ट नुसती कौतुकास्पदच नाहीं, तर माझ्या\ जीवनाला सफल करण्याची गुरुकिल्ली आहे. ठीक, पाहूं या. कोळी सातव्यांदा यशस्वी \ झाला तर मीहि परिश्रम करून यश मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न करीन."\

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रॉबर्ट ब्रूस उत्सुकतेनें आपल्या उद्धारकर्त्या कोळ्याकडे अ-निमिष दृष्टीनें पाहूं लागला. \ पाहतां पाहतां त्याचें अंत:करण आश्चर्य, आनंद आणि उत्साह ह्यांनीं भरून \ गेलें. कारण कोळी आपल्या कार्यांत यशस्वी झाला होता. तेव्हां त्यानें ही \ लढाई सुरू ठेवण्याचा दृढनिश्चय केला. त्यानें आपलें विस्कळीत झालेलें सामर्थ्य \ एकत्रित केलें आणि लढाई सुरू केली. ह्या वेळीं शिर हातावर घेऊन \ तो लढला आणि त्यानंतर त्यास सारखा विजयच मिळत गेला. शेवटीं \ बेनकच्या लढाईंत इंग्रजांना त्यानें पूर्णपणें पराजित केलें आणि आपल्या प्राणांपेक्षां प्रिय जन्मभूमीचा \ उद्धार करून तो निश्चिन्त झाला.

पाठ १०१ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

मुजफरपूर शहरांत आज मोठा उत्साह दिसत होता. तेथील नबाबसाहेबांनीं \ प्रो. राममूर्तींशीं शर्यत लावली होती. 'नबाब-साहेबांची मोटार राममूर्तींनीं थांबविली \ तर त्यांना ५०० रुपये इनाम देण्यांत यावयाचें, नाहींतर नबाब त्यांच्यापासून \ १००० रुपये वसूल करतील, अशी शर्थ होती. खेळाच्या मोठ्या तंबूंत \ तिळाएवढीहि जागा नव्हती. नबाबसाहेब आपल्या मोटारीसह हजर होते. योग्य वेळीं \ तंबूतील एका छोट्या कमानीमधून बँडच्या संगीताबरोबर एक जवान माणूस मस्त चालीनें बाहेर आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याच्या पोशाखावर चमचमणारे सोन्याचे बिल्ले लटकत होते. \ चारी बाजूंला वळून त्यानें प्रेक्षकांना नमस्कार केला. नबाबसाहेबांच्या मोटारीच्या मागील \ कप्प्यास एक दोर बांधून तो त्याच्या कमरे-भोंवतीं बांधण्यांत आला. \ नंतर त्यानें नबाबसाहेबांस मोटार जोरांत चालविण्यास सांगितलें. प्रथम मोटार थोडीशी \ पुढें चालली. प्रेक्षकांना वाटलें कीं राममूर्ति हरले. तो जवान हंसत हंसत मागें सरकला. ह्या वेळीं नबाबांनीं मोटारची गति वाढवितांच एका \ गाडलेल्या फळीस पाय अडवून तो मागें रेलला. दोनएक हात \ पुढें गेलेली मोटार मागें खेचली गेली. नबाबांनीं मोटारला पूर्ण गति \ दिली. मोटार उडूं लागली, परंतु राममूर्ति जसेच्या तसेच उभे. बिचाऱ्या नबाबसाहेबांचा चेहरा फिक्का पडला. राममूर्ति विजयी झाले. प्रेक्षकांनीं टाळ्यांचा गजर \ केला. नंतर राममूर्तींनीं आपली एक मोटार आणविली. दोन्ही मोटारींना दोन \ दोर बांधून ते त्यांच्या कमरेभोंवतीं घट्ट आवळले आणि दोन्ही मोटारींना \ उलट दिशेस हांकण्याची आज्ञा दिली. पहिल्यासारख्या दोन्ही मोटारी उडूं लागल्या. \ परंतु राममूर्ति जरासेहि हलले नाहींत. प्रेक्षकांच्या आनंदास सीमा राहिली नाहीं. \ टाळ्यांच्या गजरानें तंबू फाट-ण्याची पाळी आली.

आज हिंदुस्थानच्या घराघरांत राममूर्तींचें \ नांव प्रसिद्ध आहे. ते हत्तीला आपल्या छातीवर चढवीत असत. २५ \ घोड्यांच्या शक्तींच्या दोन मोटारी थांबवीत असत. छातीवर मोठमोठे दगड ठेवून \ ते फोडवीत असत. अर्धा इंच मोठी लोखंडाची सांखळी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कमलनालाप्रमाणें सहज \ तोडीत असत. पन्नास माणसें बसलेली गाडी आपल्या शरीरावरून जाऊं देत \ असत. इतकेंच नव्हे, परंतु ७५ मैलांच्या वेगानें धांवणारी मोटार आपल्या \ शरीरावरून जाऊं देत असत. हें अलौकिक बल आहे. ही दैवी \ शक्ति आहे. ऐकून आश्चर्य वाटतें. पाहून तोंडांत बोट घालावें लागतें. \ परंतु जरी दिसण्यांत ह्या गोष्टी असंभवनीय असल्या तरी असाध्य नाहींत. \ प्रयत्न केला असतां मनुष्य राममूर्तींप्रमाणें बनूं शकतो. राममूर्ति म्हणतात कीं, अशक्यता मला माहीत नाहीं. एक वेळ, \ दोन वेळ, तीन वेळ, पांच वेळ, दहा वेळ–प्रयत्न \ करीत रहा. यश जरूर मिळेल. 'कार्यं साधयामि शरीरं वा पातयामि।'—करीन तरी नाहींतर मरेन, हा आमचा सिद्धांत आहे.

पाठ १०२ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

राममूर्तींमध्यें जें अलौकिक बल आपण पाहतों तें सारखे प्रयत्न करीत \ राहण्याचें फल आहे. ईश्वरदत्त देणगी नव्हे. लहानपणीं ते अगदीं दुबळे \ आणि कमकुवत होते. दोन वर्षांचे असतांनाच त्यांना दमा झाला होता. \ त्यांचा चेहरा फिक्का व रोगट दिसत असे. आपल्या दुबळेपणाचें त्यांना \ फार दुःख झालें. भीम, लक्ष्मण, हनुमान् ह्यांच्या कथा ऐकून त्यांना \ वाटत असे कीं, जर त्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रमाणें आपण बलवान् असतों तर किती \ उत्तम झालें असतें ! शाळेंत शिकत असतांना त्यांचे असेच विचार असत. \

परंतु नुसती कल्पना येऊनच काम भागत नाहीं. कर्मवीर लोक आपल्या \ कल्पनांना कार्यरूपांत परिणत करून जगांत विजयी होतात. बालपणांतच राममूर्तींनीं कसरत \ करण्यास सुरुवात केली. आपल्या शाळेंतहि ते फूटबॉल वगैरे खेळूं लागले. \ कांहीं दिवस विलायती रीतीचीहि कसरत केली, \ परंतु कांहीं फायदा झाला \ नाहीं. म्हणून त्यांनीं हार मानून देशी रीतीची कसरत सुरू केली. आखाड्यांत \ दंड-बैठका आणि कुस्ती खेळूं लागले. ते म्हणतात, "कसरत करण्यानें प्रथम \ शरीर आंखडूं लागतें. पुष्कळ वेळां अर्धा व्यायाम करूनच मी सोडून \ देत असें. आखाड्यांत येण्याचें जिवावर येत असे. परंतु मीं यशस्वी \ होण्याची प्रतिज्ञा केली होती. असा विचार केला होता कीं, शारीरिक \ शक्ति मिळाली नाहीं तर मी मरून जाईन. नंतर मला यश \ मिळूं लागलें. थोडी थोडी कसरत वाढूं लागली. त्या दिवसांत \ मी अगदीं सकाळींच उठून घरापासून तीन कोसपर्यंत पळत असें. नंतर आखाड्यांत \ जाऊन खूप कुस्ती करीत असें. नंतर पुन्हां तीन कोस पळत \ घरीं येत असें व तेथें माझ्या शिष्यांबरोबर कुस्ती खेळत असें. \ त्या वेळीं माझ्या आखाड्यांत दीडशें जवान होते. त्यांच्याबरोबर कुस्ती खेळून \ आळसावल्यावर पोहावयास जात असें. नंतर उभें राहण्याचीहि अंगांत ताकद राहत नसे, इतका मी थकें. माझे मित्र मला वर घेऊन जात असत \ आणि माझा लंगोटहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेच खोलीत असत. पुन्हां संध्याकाळीं पंधराशेंपासून \ तीन हजारांपर्यंत दंड आणि पांच हजारांपासून दहा हजारांपर्यंत बैठका काढीत \ असें. हाच माझा रोजचा व्यायाम असे. ह्याचें फल ह्मणजे मी सोळा वर्षांचा झालों असतां माझी इतकी शक्ति वाढली \ कीं, नारळाच्या झाडावर जोरानें धक्के मारले असतां दोनतीन नारळ बदाबद \ खालीं पडत असत."

ह्या राममूर्तींचें भोजनहि आश्चर्यकारक होतें. आजकालचे विद्यार्थी \ थोडेंसें जास्त भोजन झालें असतां पोट दुखतें म्हणून इवळत बसतात \ व पचनक्रिया बिघडल्याची ओरड करतात. ह्याचें कारण हेंच कीं, त्यांच्या \ अंगांत अन्न पचवून रक्त बनविण्याची शक्ति नसते. राममूर्तींची अशी गोष्ट \ नव्हती. दहीं त्यांना फार आवडत असे. दुपारीं बारा वाजतां भोजन, \ कसरत वगैरे करून मोकळे होत असत. त्या वेळीं ते बदामाचें \ सरबत पीत असत. दोन तासांनीं तीन शेर दहीं, भाजी, भात \ आणि अर्धा शेर तूप खात असत. दिवसभरांत दोनतीन शेर \ बदाम त्यांच्या पोटांत जात असत आणि केव्हां केव्हां अर्धाएक शेर \ मलईंत सोन्या-चांदीचा वर्खहि चाटीत असत. त्यांना दूध आवडत नसे. मांस, \ मासे, दारू ह्यांस ते कधींहि शिवत नसत. ह्या अभक्ष्य \ वस्तूंचा त्यांनीं सदोदित त्यागच केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १०३ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

राममूर्तीचें बल असाधारण वाढलें. त्यांच्या शरीराचें सौष्ठव आणि सौंदर्य पाहून \ लोक प्रसन्न होत असत; परंतु आतां त्यांना आपल्या बलाची परीक्षा \ पाहण्याची तीव्र इच्छा झाली. योगायोग असा कीं, त्याच वेळीं प्रसिद्ध \ युरोपिअन पहिलवान यूजेन सँडो–ज्याची डंबेल्सची कसरत आज भारतवर्षांत प्रचलित \ होत आहे. सर्व जगांत आपल्या शक्तीचा डंका पिटीत आणि जगांतील\ नामवंत पहिलवानांचा नक्षा उतरवीत हिंदुस्थानांत आला. तो जेव्हां मद्रासला आला \ तेव्हां राममूर्ति आपल्या बलाची परीक्षा करण्यासाठीं आतुर झाले. त्या वेळीं \ ते म्हणाले,

" सँडोच्या शक्तीची परीक्षा कशी होईल आणि त्याच्यापुढें \ माझा टिकाव लागेल कीं नाहीं हें जाणण्याची मला अत्यंत उत्सुकता \ होती. शेवटीं मीं सँडोच्या नोकरांशीं संधान बांधलें. एक दिवस त्याच्या \ नोकराला नशेची वस्तु चारून त्याला झोंपीं जाऊं दिलें आणि तंबूत \ शिरून सँडोच्या डंबेल्सची परीक्षा केली. मला तत्काल समजून आलें कीं, \ सँडो फक्त चलाखीनें कीर्ति लुटीत आहे. तो शक्तिशाली आहे. परंतु \ जेवढी दाखवितो तेवढी खरोखरी नाहीं. दुसऱ्याच दिवशीं मीं त्याला कुस्ती \ खेळण्याचें आव्हान दिलें. परंतु त्यानें जाणलें कीं, मी त्याच्यापेक्षां शक्तिशाली\ आहें. म्हणून त्यानें असें सांगून आपली अब्रू वाचविली कीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'मी \ काळ्या माणसाशीं कुस्ती खेळूं शकत नाहीं.' मला आशा वाटत होती \ कीं, सँडोशीं कुस्ती खेळून त्याला चीत करण्यांत मला प्रसिद्धि मिळेल. \ परंतु त्यानें 'नाहीं' म्हटल्यावर माझे मनचे मांडे मनांतच राहिले."

कसेंहि \ असो, सँडोला पाहून सर्व जागीं फिरून आपल्या शक्तीची करामत दाखवावी \ अशी त्यांना इच्छा झाली. प्रथम एखाद्या सर्कशींत शिरून आपली करामत \ दाखविण्याची त्यांची इच्छा होती; परंतु स्वर्गीय लोकमान्य टिळक ह्यांच्या उत्ते-जनानें \ आणि मदतीनें त्यांनीं आपली एक स्वतंत्र सर्कस काढली. सँडोनें वजन \ उचलण्यांत जास्त नांव मिळविलें होतें. तो पन्नास मणांचें वजन उचलीत \ असे. राममूर्ति त्याच्याहून दुप्पट-तिप्पट बोजा उचलीत असत. आपल्या खेळांत \ जवळ जवळ शंभर मण वजनाचा हत्ती ते आपल्या छातीवर घेत असत, ही \ गोष्ट जग-प्रसिद्ध आहे.

हिंदुस्थानांत आपल्या बलाचा डंका गाजवून ते \ विदेशांतहि गेले. इंग्लंड, फ्रान्स इत्यादि युरोपिअन देशांतहि त्यांची छाप \ बसली. इतकेंच नव्हे, तर त्यांची शक्ति पाहून कित्येक विदेशी पहिलवान जळफळूं लागले आणि त्यांना मारण्याचेंहि प्रयत्न झाले. मलाका बेटांत त्यांना \ दोनदां विष देण्यांत आलें. पहिल्या वेळीं विषाचें लक्षणहि दिसून आलें \ नाहीं. त्यांच्या बलवान् आंतड्यांनीं तें सहज पचविलें. परंतु दुसऱ्या वेळीं \ त्यांना इतकें विष दिलें गेलें कीं, त्यायोगें एक बलिष्ठ घोडाहि मेला \ असता. विषाचीं लक्षणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिसतांच राममूर्तींनीं लंगोट बांधून पांच हजार दंड \ काढले. घामाबरोबर पुष्कळच विष बाहेर पडलें, तरीहि त्यांना पुष्कळ दिवस \ खाटेवर पडून राहावें लागलें. त्याचप्रमाणें फ्रान्समध्येंहि कांहीं दुष्टांनीं जाळें रचून \ राममूर्तींना मारण्याचा प्रयत्न केला. राममूर्ति छातीवर हत्ती चढविण्यापूर्वी एक तक्ता \ ठेवीत असत. त्याच्यावर हत्ती आपले पाय ठेवीत असे. तेथें \ दुष्ट लोकांनीं त्यांच्या युरोपिअन मॅनेजरास लांच चारून त्या तक्त्याचे दोन \ तुकडे करून ते सरसानें जोडले.

पाठ १०४ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

राममूर्तींच्या छातीवर हत्ती येतांच तक्ता काडकन् तुटला. हत्तीचा एक पाय \ राममूर्तींच्या छातीवर वज्राप्रमाणें पडला. बरगड्यांचीं तीन हाडें तुटलीं व ते \ बेहोष झाले. फ्रान्सच्या अनेक कुशल डॉक्टरांच्या कृपेनें ते चांगले झाले. \ परंतु सहा आठवडे त्यांना हॉस्पिटलमध्यें काढावे लागले. म्हणून आमंत्रण आलें \ असूनहि ते जर्मनीस जाऊं शकले नाहींत. अमेरिका, ऑस्ट्रेलिया वगैरे देशांत \ ते जाणार होते, परंतु मध्यें पुष्कळ विघ्नें आल्यानें ते जाऊं \ शकले नाहींत. राममूर्तींनीं युरोपांतील पहिलवानांना आव्हान केलें; परंतु कोणीच पुढें \ आला नाहीं. राममूर्तींच्या आधींच गामा व इमामबक्ष अशा हिंदुस्थानच्या नामी \ पहिल-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वानांनीं इंग्लंडांत स्टेन्सेलर्स जिविस्को नांवाच्या रशियन पहिलवानाला पराजित केलें होतें. \ म्हणून हेकेन स्मिथ नांवाच्या प्रसिद्ध युरोपिअन पहिलवानाचीहि राममूर्तींच्या पुढें येण्यास \ छाती झाली नाहीं.

राममूर्तींचा जन्म दक्षिण हिंदुस्थानांतील आन्ध्र प्रदेशांतील वीरघट्टम् \ नांवाच्या गांवांत झाला होता. त्यांचे वडील पोलिस इन्स्पेक्टर होते. आजकाल \ राममूर्तींनीं कसरतीचे खेळ करणें बंद केलें आहे. त्यांची अशी इच्छा \ आहे कीं, भारतवर्षांत सर्वत्र आखाडे सुरू व्हावेत आणि येथील लहान \ मुलांत आणि तरुणांत वीरश्रीचा संचार व्हावा. ह्या कार्यासाठीं त्यांनीं \ एक योजना तयार केली आहे. इंदूर संस्थाननें आपल्या शाळांसाठीं तिचा \ स्वीकार केला आहे. राममूर्ति नुसते पहिलवानच नाहींत, तर ते बुद्धिमान्हि आहेत. त्यांनीं \ मॅट्रिकपर्यंत इंग्रजीचा अभ्यास केला असून ते संस्कृतहि चांगलें जाणतात. ते \ हिंदी उत्तम बोलतात. ते ब्रह्मचर्याचे कट्टर पक्षपाती आहेत. तरुणपणीं त्यांची \ छाती ४८ इंच असून फुगविली असतां ५६ इंचांपर्यंत वाढत असे. \

मोठे हंसतमुख आहेत. हंसणें आरोग्यासाठीं फार उपयोगी आहे असें \ ते समजतात. पावित्र्य हा ब्रह्मचर्याचा पाया आहे असें ते मानतात. \ ‘ मनानें, वचनानें आणि शरीरानें पवित्र रहा, साधें अन्न खा आणि \ साधी राहणी ठेवा; रोज व्यायाम करा.’ असा त्यांचा उपदेश आहे. \ हेच संसारांत सुखी होण्याचे प्रमुख उपाय असें ते मानतात. भारतीय \ तरुणांची आजची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुर्बलता पाहून त्यांना अत्यंत दुःख होतें. त्यांचा उद्धार \ करण्याच्या कळकळीनें ते म्हणतात :

"भारतीय तरुणांचा उद्धार हेंच माझ्या जीवनाचें \ उद्दिष्ट आहे. कृष्ण, लक्ष्मण, भीम, भीष्म किंवा हनुमान् न झाले \ तरी देशांत तरुणांची एक अजेय सेना तयार व्हावी अशी माझी \ इच्छा आहे."

देशाच्या कोनाकोपऱ्यांत हिंडून राममूर्तींनीं तरुणांना प्रोत्साहन दिलें आहे. \ तन, मन, धन आणि वचनानें राममूर्ति खरे भारतसेवक झाले आहेत. \ भारतीय बालकांनो व तरुणांनो, आजपासून आम्ही धष्टपुष्ट होऊं, कसरती करूं आणि बलवान् \ व सदाचारी बनण्याचा पूर्ण प्रयत्न करूं, अशी तुम्ही प्रतिज्ञा करणार नाहीं काय ?

पाठ १०५ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

आपण पाण्यास कोणत्या रीतीनें शुद्ध करूं शकतों ? तीन प्रकारांनीं आपण \ पाण्यास शुद्ध करूं शकतों : (१) पाण्यास गरम करून; (२) फिलटर करून (कोळसा, वाळू, चुना इत्यादींचा \ उपयोग करून); (३) रासायनिक प्रयोगद्वारा. पाण्यास गरम करणें इतकें सोपें \ आहे कीं गरीबांतला गरीबहि तें करूं शकतो. परंतु खेदाची गोष्ट ही \ आहे कीं, लोक हें करीत नाहींत. पाण्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असे कांहीं जंतु असतात \ कीं ते मनुष्याचे भयंकर शत्रु आहेत. परंतु पाणी उकळलें असतां \ ते मारले जातात. ह्या साधनानें शेंकडों मनुष्यांचें जीवन वांचू शकतें. \ तुम्हांस गरम करून थंड केलेलें पाणी प्यालें पाहिजे आणि ही \ माहिती आपल्या घरांत आणि मित्रमंडळींत पसरवली पाहिजे. मोठ्या शहरांतली म्युनिसीपालिटी \ पाणी गरम करण्याची व्यवस्था करूं शकत नाहीं. कारण तिला हें \ शक्य नाहीं कीं, सर्वच पाणी गरम करून दिलें जाईल. परंतु \ रासायनिक रीत्या ती फिल्टर (साफ) करूं शकते. माझें मत असें \ आहे कीं, पिण्याचें पाणी गरमच केलें पाहिजे.

खेडेगांवांत रोज पाणी \ भरण्याची रीत आहे. साधारणपणें मडक्यांत, बादलींत किंवा लहान लहान हौदांत \ पाणी भरतात. परंतु त्यांतहि खालीं लिहिलेल्या चुकांपासून सावध राहिलें पाहिजे: \

१. आपलीं भांडीं उघडीं ठेवूं नयेत. कारण त्यामुळें रेती किंवा \ किडे त्यांत पडण्याची भीति असते आणि असाहि संभव असतो कीं, \ कुत्रीं-मांजरें पाणी पिऊन जातात.

२. घाण भांडें किंवा तपेली \ त्या भांड्यांत घालूं नयेत.

३. पाणी भरण्याच्या जागीं बिलकुल घाण \ नसावी.

आमच्या देशांत पुष्कळांची अशी समजूत आहे कीं, पाण्याच्या स्पर्शानें \ प्रत्येक वस्तु साफ होते. परंतु ध्यानांत ठेवण्याची गोष्ट अशी कीं, \ रोगी मनुष्य पाण्यांत स्नान करितात किंवा कपडे धुतात तेव्हां स्वतः \ पाणीच घाण आणि भयंकर होतें. पाणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिसण्यांत स्वच्छ दिसत असलें \ तरी आरोग्याच्या दृष्टीनें तें भयंकर असूं शकतें. रोग उत्पन्न करणारे \ जंतु इतके सूक्ष्म असतात कीं स्वच्छ दिसणाऱ्या पाण्यांतहि ते पुष्कळच \ असूं शकतात. एका इंग्रजी पत्रिकेंत ह्या जंतूंच्यासंबंधीं असें लिहून \ आलें आहे कीं, जर एक चहाचा चमचाभर पाणी जगांतील सर्व \ लोकांत वांटलें आणि सेकंदास एक ह्या गतीनें रोज बारा तास \ त्यांतील जंतूंना जर ते मोजूं लागतील तर ते सर्व मोजण्यास त्यांस २०००० वर्षें लागतील! \

असें म्हणतात कीं, चिनी लोक पाण्याच्या बाबतींत फार काळजी घेतात. \ ते म्हणतात कीं, गरम न केलेलें पाणी आरोग्याची हानि करणारें \ आहे. साध्या पाण्यास ते फार भितात. कपड्यानें गाळलें तरी त्यांत \ जंतू राहून जातात. कारण ते इतके सूक्ष्म असतात कीं, कितीहि \ तलम कपड्यांतून गाळलें तरी पाण्याबरोबर ते सहज निसटतात. पिण्याचें चांगलें \ पाणी गरम केल्यानंतरच मिळं शकतें.

उन्हाळ्याच्या दिवसांत गरम केलेलें पाणी \ पिणें हेंच अत्यंत इष्ट होय. प्रत्येक वेळीं भोजन करतांना थोडें \ थोडें पाणी पिण्यापेक्षां नंतर थोड्या वेळानें पुरेसें पाणी पिणें आरोग्याच्या \ दृष्टीनें अत्यंत हितकारक आहे. प्रत्येक व्यक्तीला दिवसभर थोड्या थोड्या वेळानें \ पाणी पिण्याची जरूरी आहे. आणि निजतांना \ एक ग्लास, तसेंच उठल्याबरोबर एक ग्लास पाणी पिण्याचा नियमच करून \ टाकणें जास्त चांगलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्व पेय पदार्थांत पाणी सर्वश्रेष्ठ होय. होईल तितकें चहा-\ कॉफीपासून प्रत्येकानें दूर राहावें. फेरफार करावाच लागला तर हलका \ चहा वापरावा. जास्त गरम चहा कधीं पिऊं नये. जास्त गरम \ वस्तु पोटांत क्षतें उत्पन्न करतात. बाजारांतील दुकानांतून मिळणारीं स्वस्त संस्कारित \ पेयें (सोडा, लेमन) हीं पिण्यायोग्य नाहींत. त्यांतील कांहीं, घाण पाण्यांत \, अपवित्र रीतीनें बनवितात. त्याचप्रमाणें घाण पाण्याचा बनविलेला बर्फहि भयानक आहे. \ म्हणून थंड पेयें बनवितांना बर्फ आंत न टाकतां ग्लासाच्या बाहेर \ ठेवावा. मलईचें आइस्क्रीम व स्वस्त सरबतें हीं भयंकर आहेत. त्यांच्या \ सेवनानें लोक कॉलरा आणि आव ह्या \ रोगांना बळी पडतात. त्याचप्रमाणें \ दारूसंबंधींहि मला कांहीं सांगावयाचें आहे. दारू हें पेय नव्हे. तें एक विषारी औषध आहे. तें निरोगी मनुष्यास अनावश्यक आहे. ही \ वस्तु आरोग्याचा नाश करून तिच्या नादीं लागणाऱ्यांची बुद्धि भ्रष्ट करते. \

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

OPINIONS
OF
Prominent Persons
ON
SANKET LIPI

संकेत-लिपि
पर
प्रसिद्ध विद्वानों
की
सम्मतियां

आविष्कारक और प्रकाशक—
एल० पूनमचन्द जैन,
ब्यावर (रजपुताना)

Printed by Keshavlal Sankalchand Shah
at The "Virvijaya" Printing Press,
Salapos Cross Road-Ahmedabad.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

L. P. Jain's Sanket Lipi (Short-hand)

A WONDERFUL INVENTION

DON'T LOSE THE GOLDEN OPPORTUNITY

TO LEARN

The matchless short-hand in the world. Why is it not the way to meet with the world wide popularity ?

(1) It is destined to meet with marvellous success in near future all over the world.

(2) It is soon to be approved of by the Educational Boards, Public Examination Bodies, mercantile firms, offices and all kinds of employers who seek economy in time and rapidity in work.

(3) It is the only one of its kind, complete, accurate and systematic in all respects.

(4) It is the only easiest and simplest Short-hand as it is based on 38 Symbols only.

